# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

*(आस्थापना विभाग)*

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५
फोन नंबर ०७१३२–२१६५१२

**क्र. गो.वि/आस्था/143 /२०१७** — **दि. :17 /०१/२०१७**

## परिपत्रक

**विषय** :– विद्यापीठ व महाविद्यालय विद्यार्थ्यामध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याकरिता मतदार जागृती अभियान राबविण्याबाबत.

**संदर्भ** :– शासन परिपत्रक क्रं. संकीर्ण २०१६/प्र.क्रं.६८३/१६/विशि–३, दि. २३ डिसेंबर २०१६.

गोंडवाना विद्यापीठातील संलग्नीत सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त संदर्भिय शासन परिपत्रकानुसार माहे फेब्रुवारी २०१७ मध्ये होणा–या महानगरपालिका, जिल्हापरिषदा व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुका दृष्टीपथात ठेवून मतदार जागृती मोहीम राबविणे आवश्यक आहे. सदर शासन परिपत्रकानुसार मतदान जागृती करण्यासाठी जागृती अभियान राबविण्याबाबत सूचना निर्गमीत केल्या आहेत. शैक्षणिक संस्था व महाविद्यालयांनी सदर परिपत्रकानुसार मतदार जागृती अभियान समिती स्थापन करावी. महाविद्यालयात आपल्या स्तरावर आयोजीत केलेल्या प्रशिक्षण व कार्यक्रमाबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल शासनास उपलब्ध करुन देण्यात यावा. तसेच सदर अहवालाची ०१ प्रत विद्यापीठास सादर करण्यात यावी.

**सहपत्र संलग्नः–**
१.उपरोक्त संदर्भिय पत्र.

(दिपक एस. जुनघरे)
कुलसचिव(का)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विद्यापीठ व महाविद्यालय विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याकरिता मतदार जागृती अभियान राबविण्याबाबत...

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 1061 दि. 7-1-17
जावक क्र. ........ दि. ........

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन परिपत्रक :- संकीर्ण २०१६/प्र.क्र. ६८३/१६/विशि-३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२.
दिनांक - २३ डिसेंबर, २०१६

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 50 दि. 05/01/17
जावक क्र. 192 दि. 06/01/17

शासन परिपत्रक :-

लोकशाही व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी राज्यातील विविध स्वरूपाच्या होणाऱ्या विविध निवडणुकांमध्ये मतदार नोंदणी व मतदानाचे प्रमाण जास्तीत जास्त वाढविण्यासाठी सर्व विभागांनी प्रयत्न करण्याबाबत राज्य निवडणुक आयोगाचे आदेश आहेत. माहे फेब्रुवारी २०१७ मध्ये होणाऱ्या महानगरपालिका, जिल्हापरिषदा व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुका दृष्टीपथात ठेवून मतदार जागृती मोहिम राबविणे आवश्यक आहे. त्यानुसार विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये/संस्था यांना सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याप्रमाणे आता खालील प्रमाणे मतदान जागृती करण्यासाठी जागृती अभियान राबविण्याबाबत आपणास सूचित करण्यात येत आहे.

१) मतदार जागृती अभियान समितीची स्थापना :

अ) **विद्यापीठस्तरीय समिती** :- सर्व अकृषी विद्यापीठांनी त्यांचे स्तरावर मतदार जागृती अभियान समितीची स्थापना करावी. सदरहू समितीमध्ये संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ, समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना, संचालक, अजीवन व निरंतर शिक्षण विभाग, कम्युनिटी रेडिओ, समन्वयक आभासी वर्ग खोली, विभागप्रमुख राज्यशास्त्र, पत्रकारीता, जनमाध्यम इत्यादी सदस्यांचा समावेश असेल. कुलसचिव या समितीचे प्रमुख असतील.

आ) **महाविद्यालय/संस्था स्तरीय समिती** :- प्रत्येक महाविद्यालयांतर्गत विभागात मतदार जागृती अभियान समन्वय समिती गठीत करण्यात यावी. सदर समितीमध्ये महाविद्यालये/संस्था/विभाग यांचे संचालक/प्राचार्य/ विभागप्रमुख यांचेसह राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, चेअरमन, सांस्कृतीक विभाग, चेअरमन, विद्यार्थी परिषद, एन.सी.सी. कार्यक्रम अधिकारी, विभागप्रमुख, राज्यशास्त्र विभाग, ज्येष्ठ प्राध्यापक आणि क्रियाशिल विद्यार्थी इत्यादींचा समोवश असावा.

Dr. Dube DR

२) सदरहू विद्यापीठ स्तरीय समिती विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालये व संस्था यांच्या कार्यक्षेत्रात राबवले जाणारे मतदार जागृती अभियानाची रुपरेषा निश्चित करुन कृती आराखडा तयार करेल व त्याच्या परिणामकारक अमंलबजावणीसाठी समन्वय साधेल व वेळोवेळी सूचना निर्गमित करेल.

३) आभासी वर्गखोली, कम्युनिटी रेडिओ व इत्यादि अत्याधुनिक माध्यमांचा परिणामकारक वापर मतदार जागृती अभियानासाठी करावा.

४) विद्यापिठांकडून राबविण्यात येणारे उपक्रम जसे – कॉफी विथ व्हि.सी., विद्यार्थी रिसर्च ॲण्ड एक्सटेंशन कार्यक्रमातंर्गत मतदार जागृती अभियानाचा समावेश करण्यात यावा.

५) १०० टक्के संकल्प व शपथ घेणाऱ्या महाविद्यालयांचा गौरव तसेच उत्कृष्ट अभियान राबविणाऱ्या महाविद्यालयांचा योग्य गौरव करावा.

६) महाविद्यालये/संस्था यांनी खालीलप्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करावे:-

अ) संपर्क अधिकाऱ्याची नियुक्त :- मतदार जागृती अभियानासाठी संपर्क अधिकारी यांची नियुक्ती करण्यात यावी. ज्याठीकाणी राष्ट्रीय सेवा योजना असेल त्याठिकाणी मुख्य कार्यकारी अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना हे संपर्क अधिकारी म्हणून काम पाहतील अन्य ठिकाणी ज्येष्ठ प्राध्यापकांची संपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात यावी.

आ) विविध कार्यक्रम :- महाविद्यालये/संस्था यांनी त्यांचे महाविद्यालयात/विभागात मतदान जागृती अभियानावर आधारीत व्याख्याने, परिसंवाद, वाद विवाद स्पर्धा, पथनाट्ये, वत्कृत्व स्पर्धा इत्यादी आयोजित कराव्यात. तसेच वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ, युवा महोत्सव, स्नेहसंमेलन या कार्यक्रमाच्या वेळी मतदार जागृतीच्या अनुषंगाने पोस्टर लावून निर्भयपणे मतदान करण्याचा संदेश देण्यात यावा.

इ) गृहसंकुल दत्तक योजना :- महाविद्यालये/संस्था/विभागातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या जवळच्या परिसरातील गृहनिर्माण संस्था आणि विद्यार्थ्यांच्या रहिवाशी संकुल हे दत्तक घ्यावे. या दत्तक घेतलेल्या संकुलातील मतदारांनी कोणत्याही अमिषाला बळी न पडता निर्भयपणे मतदान करण्याचे आवाहन करुन तेथे जास्तीत जास्त मतदान करण्यासाठी प्रयत्न करावेत.

ई) वातावरण निर्मिती :- तरुण वर्गाने पदयात्रा, मानवी श्रृंखला, पथ नाट्य, इ. स्वरुपाचे उपक्रम राबवावेत.

उ) सामाजिक माध्यमे :- तरुण वर्गाने जास्तीत जास्त सामाजिक माध्यमांचा जसे- फेसबुक, ट्विटर, गुगल, व्हॉटस्अप, हाईक इत्यादीचा वापर करावा. राज्य निवडणूक आयोगाच्या सामाजिक माध्यमांवरील पोस्टचा अधिकाधिक प्रसार करावा.

ऊ) संकल्प व शपथ :- प्रत्येक विद्यार्थ्याने मतदान करण्याबाबत संकल्प व शपथ घ्यावी. तसेच त्यांनी त्यांच्या कुटूंबियांकडून व शेजाऱ्यांकडून देखील मतदार करण्याबाबत संकल्प व शपथ घ्यावी.

ऋ) प्रशस्तीपत्र :- उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्र व बक्षीसाद्वारे प्रत्येक महाविद्यालयाने गौरव करावा.

७) प्रत्येक महाविद्यालयांनी आपला अभियान कार्यअहवाल विद्यापीठ स्तरीय मतदार जागृती अभियान समितीकडे सादर करावा.

८) विद्यापीठांनी सदरहू अहवाल महाराष्ट्र राज्य निवडणुक आयोगाकडे सादर करावा, तसेच त्याची प्रत राज्य शासनास सादर करण्यात यावी.

सदर आदेशाप्रमाणे इतर होणाऱ्या निवडणुकांमध्ये देखील मतदार जागृती मोहिम राबविण्यात यावी.

(सिध्दार्थ खरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.आयुक्त, राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र राज्य,
सर्व कुलगुरू/ कुलसचिव, अकृषी विद्यापीठे.
सर्व संचालक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग.
सर्व सह संचालक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग.